



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार १५ ऑक्टोबर २०२४ | अंक ३०९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

# पाच वर्षात एक रुपयाचा ही डाग लावुन घेतला नाही आ. बाळासाहेब आजबे

**बीड प्रतिनिधी :- गोकुळ इंगोले**

गेल्या पाच वर्षाच्या कार्यकाळामध्ये आपण मतदारसंघात जवळपास 2300 कोटी रुपये ची विकास कामे मंजूर करून आणले आहेत त्यापैकी अनेक कामे प्रगतीपथावर असून काही कामे पूर्ण झालेली आहेत हे सर्व कामे करत असताना आपण एक रुपयाचाही कोठे डाग लावून घेतला नाही जनतेच्या सेवेसाठी निस्वार्थपणे काम करत राहिलो त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत जनता आपल्याबरोबर आहे आष्टीची महायुतीची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला सुटणार आहे त्यात काही खालीवर झाले तर धोंडे साहेबांचे काम मी करील किंवा माझे काम धोंडे करतील असे यावेळी बोलताना आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी सांगितले .

आष्टी तालुक्यातील महसूल कर्मचारी निवासस्थान व आष्टी नगरपंचायत हद्दीतील पंधरा कोटी रुपयेच्या विकास कामांचा शुभारंभ आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या हस्ते सोमवार दिनांक 14 ऑक्टोबर रोजी सकाळी 11 वाजता संपन्न झाला या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष काकासाहेब शिंदे माजी जिप सदस्य डॉक्टर मधुकर हंबर्डे युवक राष्ट्रवादीचे तालुका



अध्यक्ष भाऊसाहेब घुले महादेव महाजन हरिभाऊ दहातोंडे परशुराम आबा मराठे संदीप सुंबरे नगरसेवक नाजीम शेख सुखदेव पोकळे यांचे प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना आमदार आजबे म्हणाले की आष्टी नगरपंचायत अंतर्गत आपण मोठ्या प्रमाणात निधी आणला आहे आष्टी पाटोदा शिरूर या तिन्ही नगरपंचायत मध्ये जवळपास पंधरा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे कामे करताना नगरपंचायतला विश्वासात घेऊन कामे कार्यकर्त्यांनी करावीत कुठल्याही प्रकारची अडचण येणार नाही याची पण खबरदारी संबंधित गुत्तेदार यांनी घ्यावी आष्टी येथील शनी मंदिर व फत्तेशहा बुखारी दर्गा परिसरात नारळ फोडून कामांचा शुभारंभ करण्यात आला तर आष्टी तालुक्यातील महसूल कर्मचाऱ्यांसाठी 13 कोटी 80 लक्ष रुपयांच्या महसूल निवासस्थानाच्या इमारतीचे उद्घाटन पंचायत समिती शेजारी परिसरात करण्यात आले यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की आष्टी पाटोदा शिरूर या तिन्ही तालुक्यातील शासकीय कार्यालयासाठी जवळपास 100 ते 150 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे त्याचबरोबर या कर्मचाऱ्यांच्या निवासनासाठी ही मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून हे कामे मंजूर केले आहेत त्यामुळे यापुढे सरकारी कर्मचाऱ्यांच्या कार्यालय व त्यांचे निवासस्थाने हे सुसज्ज असणार आहेत त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांच्या कामास गती मिळण्यास मदत होईल याचबरोबर मतदारसंघात प्रत्येक ठिकाणी काम करण्याचा व ते काम दर्जेदार कसे होतील यासाठी गेल्या पाच वर्षात सरकारकडे पाठपुरावा करून कामे मंजूर करून घेतली आपण केलेले विकास कामे जनतेला जर मान्य असतील तर तर येणाऱ्या निवडणुकीत आपल्याला मायबाप जनता ही पुन्हा निवडून देईल आपण गेल्या पाच वर्षाच्या काळामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात विकासकामे आणली परंतु एक रुपयालाही कोणाच्या लाजिंदार झालो नाहीत आलेली कामे जनतेपर्यंत कशी पोहोचतील व ते दर्जेदार कशी होतील यासाठी प्रयत्न केले आहेत त्यामुळे विकास कामाच्या जोरावर व जनतेच्या विश्वासावर येणाऱ्या निवडणुकीला आपण सामोरे जाणार असून जनतेने संधी दिल्यास मतदारसंघाचा विकास करण्यासाठी आपण कटीबद्ध आहोत पाच वर्षात आपण कोणावरही अन्याय होईल असे एकही काम केले नाही त्यामुळे जनतेचा विश्वास आपल्यावर आहे येणारी निवडणूक ही जनतेच्या विश्वासावर व विकास कामाच्या जोरावर आपण सामोरे जाणार असल्याचे शेवटी त्यांनी सांगितले या कार्यक्रमासाठी ग्रा प सदस्य संतोष कदम बबन काळे गणेश पडोळे पंडित पोकळे काका पोकळे दिपक पिसाळ,श्रीराम गोंदकर दिलीप चव्हाण विजय देशमुख देवेश शेट्टी अय्याज कुरेशी वाहेद सय्यद गणेश धोंडे माजेद शेख विलास गायकवाड मुकेश सायकड काशीगिर शिंगारे कृषी वाल्लेकर आकाश पवळे सुनिल निकाळजे यांच्यासह आष्टी शहरातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# गुणरत्न सदावर्तेंच्या वर्तनावर मुंबई हायकोर्टाने वर्तवली तीव्र नाराजी, मराठा आरक्षणाच्या सुनावणीत काय घडलं ?

मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकांवर मुंबई हायकोर्टात आज सुनावणी पार पडली. या सुनावणीवेळी वकील गुणरत्न सदावर्ते यांच्या वर्तनावर मुंबई हायकोर्टाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. "मराठा आरक्षणाची इतकी महत्त्वपूर्ण सुनावणी सुरू असताना सदावर्ते बिग बॉसमध्ये जाऊन बसले आहेत", अशी माहिती वकिलांकडून हायकोर्टाला देण्यात आली. "या प्रकरणातील मूळ याचिकाकर्त्यांना प्रकरणाचं गांभीर्यचं नाही का? आपली याचिका सर्वात आधी घ्या म्हणून सदावर्ते आमच्यापुढे विनंती करत होते. आता युक्तिवाद करण्याची वेळ आली तर तेच गायब झाले?", असा सवाल हायकोर्टाने केला. "मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या सर्व याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद संपला. आता कुणालाही युक्तिवाद करण्याची संधी मिळणार नाही", असं हायकोर्टाने यावेळी स्पष्ट केलं. तसेच मराठा आरक्षणासंदर्भातील प्रकरणाची हायकोर्टातील पूर्णपीठापुढील सुनावणी 19 नोव्हेंबरपर्यंत तहकूब करण्यात आली आहे. पुढील सुनावणीत राज्य सरकारतर्फे महाधिवक्ता डॉ. बीरेंद्र सराफ युक्तिवाद करणार आहेत. गुणरत्न सदावर्ते यांचा मराठा समाजाला मिळणाऱ्या आरक्षणाला विरोध आहे. भाजप नेते देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला आरक्षण दिलं होतं. पण सदावर्ते यांनी त्याविरोधात मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली होती. फडणवीस सरकारला त्यावेळी मुंबई हायकोर्टात मराठा आरक्षण टिकवण्यात यश आलं होतं. पण त्यानंतर सदावर्ते यांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली होती. सुप्रीम कोर्टात काही वर्ष सुनावणी पार पडल्यानंतर महाविकास आघाडी सरकारच्या काळात मराठा आरक्षणाला स्थगिती देण्यात आली होती. तसेच त्यानंतर ते आरक्षण अवैध ठरलं होतं. यानंतर राज्य सरकारने सुप्रीम कोर्टात पुनर्विचार याचिका दाखल केली आहे. त्यानंतर शिंदे सरकारने मराठा समाजाला 13 टक्के आरक्षण दिलं आहे. पण त्यालाही विरोध करण्यात आला असून मुंबई हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत.

# संत बाळूमामा जन्मोत्सव सोहळा पिठ्ठी येथे उत्साहात होणार साजरा 15 ऑक्टोंबर रोजी भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सोहळ्यात सहभागी व्हावे

पाटोदा प्रतिनिधी : श्री संत सद्गुरू बाळुमामा यांचा जन्मोत्सव बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी येथे भव्य उत्साहात साजरा होणार आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही 15 ऑक्टोंबर वार मंगळवार रोजी भव्य जयंती उत्सव पिठ्ठी नगरीत साजरा होणार असून भव्य कीर्तन महोत्सव चे आयोजन केले गेले आहे.

जगाचा मालक श्री संत सद्गुरू बाळुमामा यांचा महिमा पूर्ण देशात आपणास पहावयास मिळत आहे. त्यांच्या अनेक पालख्या विविध भागात फिरत असतात त्यांची मेंढरं सांभाळण्यासाठी दूर दूर वरून अनेक भाविक भक्त येत असतात. सेवा करतात. जगाच्या




मालकाचा उघडा पसारा जेथे जाईल तिथे मामाचा दरबार भरतोच. यावर्षी पिठ्ठी वासियांचे भाग्य असे की, जन्मोत्सवाच्या तोंडावर संत सद्गुरु बाळूमामा देवालय आदमापूर पालखी क्रं - 9 चे आगमन नगरीमध्ये झाले आहे. भव्य कीर्तन महोत्सवाची सुरुवात 09 ऑक्टोंबर ला सुरू झाली असून येत्या 15 ऑक्टोंबर ला मामाचा जन्मोत्सव साजरा होणार आहे. त्यामुळे पंचक्रोशीतील समस्त ग्रामस्थ भाविक भक्तांनी मामाच्या दरबारी येऊन जयंती उत्सवाच्या आनंदाच्या सोहळ्यात सहभागी व्हावे...



पूर्वेशजी प्रताप सरनाईक युवासेना कार्याध्यक्ष आणि किरणजी साळी युवासेना सचिव यांचे काल बीडमध्ये आगमन झाले असता शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्या वतीने माजी जिल्हा परिषद सदस्य किशोर जगताप यांच्यासह बीड शिवसेना महिला आघाडी, युवासेना आजी-माजी पदाधिकारी-लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक यांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यलयात पुष्पगुच्छ देऊन स्वागत सत्कार केला.

# मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी चे मानधन वितरित होत नसल्याने इकडे आड व तिकडे विहीर अशी परिस्थिती,

## मुख्यमंत्री साहेब मुहूर्त कधी बघणार, त्या प्रशिक्षण शिक्षकांच्या खात्यात पैसे जमा करायला,

बीड प्रतिनिधी अंकुश गवळी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी म्हणून शाळा व्यवस्थापनामध्ये ऑगस्ट महिन्यामध्ये आस्थापनातील एकूण रिक्त पदाच्या पाच टक्के जागा भरण्याची कार्यवाही पार पडली, यामध्ये बारावी उत्तीर्ण साठी सहा हजार रुपये पदवी झालेल्यांना आठ हजार रुपये तर पदवीत्तर पदवीधारकांना दहा हजार रुपये मानधन देण्याचे जीआर मध्ये घोषित करण्यात आलेले होते, सदर प्रशिक्षणासाठी अनेक शेतकरी शेतमजूर मुले यांचे या



प्रशिक्षणासाठी निवड झाली व ते दोन महिन्यापासून सुरळीतपणे आपले कार्य पूर्ण वेळ पार पाडत आहेत, परंतु ते काम करत असताना आज दोन महिन्यांचा कालावधी होत आलेला असताना मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी यांच्या खात्यात एक रुपयाही जमा न झाल्याने आता आपला घर खर्च किराणा सामान इतर खर्च कसा भागवायचा असा प्रश्न युवा प्रशिक्षणार्थींना पडला असून ही योजना म्हणजे बोलाचाच भात व बोलाचीच कडी अशी तर नसेल ना म्हणून युवा प्रशिक्षक यांचे मानधन संबंधित विभागाने लवकरात लवकर वितरित करावे येणाऱ्या आठवड्यामध्ये मानधन वितरित न झाल्यास प्रशिक्षणार्थी स्वतःहून या पदाचा राजीनामा देतील अशी माहिती प्रशिक्षणार्थी यांच्या माध्यमातून देण्यात येत आहे,,

# दसरा मेळावा यशस्वी; भक्तांकडून नारायण गडच्या महंतांचे स्वागत महंत शिवाजी महाराज यांचे मानले आभार

बीड/प्रतिनिधी: धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नगद नारायण गड येथे पारंपारिक दसरा मेळाव्याला मोठे स्वरूप देऊन यशस्वीरित्या अफाट नियोजन केल्याबद्दल गडाचे विश्वस्त आणि भक्तांनी मिळून महंत शिवाजी महाराज यांचे सोमवारी स्वागत केले. श्री.क्षेत्र नगद नारायण गड येथे महंत शिवाजी महाराज यांच्या नेतृत्वात पारंपारिक दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या दसरा मेळाव्याला शेकडो वर्षाची परंपरा आहे. दरवर्षी गडाच्या पायथ्याशी असलेल्या गावातील भक्तांच्या उपस्थितीत हा मेळावा संपन्न होत होता. मात्र, यावर्षी मोठा मेळावा घेण्याचा निर्णय घेण्यात आला. या मेळाव्याला मनोज जरांगे पाटील यांची उपस्थिती राहणार असल्याने राज्यभरातून भाविक मेळाव्यासाठी दाखल होणार होते. याद्दष्टीने मागील पंधरा दिवसांपासून गडावर तयारी सुरू होती. यात गडाचे महंत शिवाजी महाराज यांनी करेक्ट नियोजन करत प्रत्येक भक्तांना जबाबदारी वाटून दिली होती. शिवाय ते प्रत्येक



कामांवर स्वत: लक्ष देऊनही होते. दर दोन तासाला सुरू असलेल्या कामांचा ते आढावाही घेत होते. दरम्यान, दसरा मेळाव्यात होणाऱ्या गोष्टींचे ते स्वत: नियोजन करून ते काम करवून घेत होते. त्यांची ही धावपळ दिसून येत होती. याच नियोजनातून महाराष्ट्रातील हा सर्वात मोठा दसरा मेळावा ठरला. दसरा मेळाव्याचे यशस्वी नियोजन केल्याबद्दल सोमवारी विश्वस्त बळीराम गवते, बी.बी.जाधव आणि गडाचे भक्त बळी जिजा चव्हाण,पत्रकार मुकेश झणझणे, केशव कदम,डॉ बाळासाहेब पिंगळे,नवनाथ काशिद,गणेश नालावडे, गुरसाळे नाना,पंकज कारंडे, राजाभाऊ गवते, ब्राम्हा नवले, हरिओम च्या उपस्थितीत महंत शिवाजी महाराज यांचे शाल, श्रीफळ आणि पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले.

# डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या विकासकामातून बदलतोय बीड मतदारसंघाचा चेहरा-मोहरा!

बीड (प्रतिनिधी) दि.१४ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पाठपुरावा करून मतदारसंघात कोट्यवधींचा निधी खेचून आणला आहे. बीड मतदारसंघाचा ५ वर्षाचा विकासाचा बॅकलॉग भरून काढत डॉ.क्षीरसागर यांनी चेहरा-मोहरा बदलण्याचा प्रयत्न केला आहे. मागील आठ दिवसात ६ कोटींच्या विकासकामांना प्रत्यक्षात सुरुवात झाली असल्याने ठिकठिकाणच्या नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. प्रगतीपथावर असलेल्या विकासकामांमध्ये पालवण चौक परिसरात योगभूषण कॉलनी, शहेंशावली दर्ग्याच्या मागील



बाजूस, प्रभाग क्रमांक २ मधील बारादरी, शिंदे यांचा मला, जुने सावरकर कॉलेज परिसर येथील अंतर्गत गल्ली, पंचशील नगर भागातील त्रिरत्न बौद्ध विहार परिसर, नवीन सरस्वती विद्यालय परिसरातील राधाकिसन नगर, प्रभाग क्र.१३ मध्ये विविध सिमेंट रस्ते व नाली बांधकाम, अंतर्गत ९ रस्ते, हायमास्ट सोलार दिवे बसविणे, हनुमान मंदिर येथे सामाजिक सभागृहाचे बांधकाम, सिंहगड कॉलनी नं.२ व जटाशंकर गल्ली, जालना रोड परिसरातील सागर हॉस्पिटल गल्ली, फुलाई नगर, कॅनॉल रोड परिसर, अंबिका चौक परिसर, अंकुश नगर परिसरातील नंदनवन कॉलनी, ग्रामीण पोलीस स्टेशन परिसर, कबाड गल्ली, पिंगळे गल्ली येथील गवळी समाज मंदिर, संत सावतामाळी सभागृह येथे कंपाउंड वॉल, इमामपूर रोड येथे मांग गारुडी समाजाचे सभागृह, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या समोर छत बांधकाम, बंकटस्वामी महाविद्यालय परिसरात त्यागी निवास (जैन मंदिर) येथे कंपाउंड वॉल, चांदणी चौक परिसरात ढोर समाजाचे सामाजिक सभागृह, पेठ बीड भागातील लोणारपुरा परिसरात लोणार समाजाचे सामाजिक सभागृह, नाळवंडी नाका परिसरातील शास्त्रीनगर अंतर्गत सिमेंट रस्ता, गांधी नगर परिसरातील वडार समाज वस्ती, मोमीनपुरा भागातील कुरेशी मोहल्ला, धोंडीपुरा भागातील केंडेवाडा गल्लीत पेव्हर ब्लॉक, रस्ता व नाली, क्रांती नगर भागातील छत्रपती कॉलनी, धानोरा रोड भागातील महात्मा फुले नगर, बापूजी नगर या भागातील रस्ते व नाली, पेव्हर ब्लॉकसह सभागृह, बांधकामाचा समावेश आहे. तसेच, ग्रामीण भागात ५ कोटींचा निधी आहे. या सर्व कोट्यवधींच्या कामांच्या भूमिपूजन प्रसंगी ठिकठिकाणी डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, माजी नगरसेवक, सरपंच आदींची उपस्थिती होती.

## ग्रामीण, शहरी भागात बरोबरीने निधी दिला -डॉ.योगेश क्षीरसागर

उपमख्यमंत्री अजितदादा, पालकमंत्री धनुभाऊ यांच्या माध्यमातून शासन, प्रशासनाकडे पाठपुरावा करून वर्षभरात बीड विधानसभा मतदारसंघात ग्रामीण, शहरी भागात आपण बरोबरीने निधी दिला. नुकतेच आठ दिवसात ७ कोटींच्या कामांना सुरुवात केली आहे. नागरिकांना अधिकाधिक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असतो. कामे दर्जेदार करून घेण्यासाठी माझ्यासह यंत्रणेचे लक्ष असते, असे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

## आ. क्षीरसागर शंभर टक्क्यांनी नापास - एस.एम.युसूफ

बिंदुसरा नदीवरील पुलाचा आणि महेदवीया दायरा कब्रस्तान च्या संरक्षक भिंतीचा प्रश्न सोडवलाच नाही

बीड (प्रतिनिधी) - बीड शहरातील मोमीनपुरा-खासबाग जोडणाऱ्या बिंदुसरा नदीवरील नियोजित पुलाचा प्रश्न तसेच मोमीनपुरा भागातील महेदवीया दायरा कब्रस्तान च्या दोन भिंती बांधून देण्याचा प्रश्न आमदार म्हणून संदीप क्षीरसागर यांना सोडवायला दिले होते पण हे दोन्ही प्रश्न ते त्यांच्या कार्यकाळात सोडवू शकले नाहीत. यामुळे आ. क्षीरसागर हे शंभर टक्क्यांनी नापास झाल्याचे हे दोन्ही प्रश्न मांडणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे. याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, कुरेशी मुहल्ला, मोमीनपुरा, मुहम्मदिया कॉलनी, बीड मामला या भागातील बहुसंख्य नागरिकांना विविध कामांसाठी शहरात येण्याकरिता जवळचा असलेला मार्ग हा बिंदुसरा नदी मधूनच येतो. जिल्हा रुग्णालयासह अनेक खाजगी दवाखान्यात जाणारे रुग्ण, विविध शैक्षणिक संस्था म्हणजेच शाळा महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी व शिक्षक, फ्रुट आडत मार्केट-भाजी मंडईत जाणारे विक्रेते आणि ग्राहक, बस स्टॅन्ड ला जाणारे-येणारे प्रवासी तसेच मोमीनपुरा भागातील मोठ्या कापड मार्केटमध्ये खरेदीसाठी जाणारे-येणारे ग्राहक बिंदूसरा नदीमधील याच मार्गाचा उपयोग करतात. हा मार्ग कच्चा असला तरी वर्षातील सात-आठ महिने येथून नागरिक पायी, सायकल, मोटरसायकल, ऑटो रिक्षा, चार चाकी वाहने आदींमधून ये-जा करतात. पावसाळ्यात जेव्हा नदीला पाणी येते तेव्हा मात्र हा जवळचा मार्ग बंद होऊन जातो. म्हणून नागरिकांना मोठा वळसा घेऊन बार्शी रोड मार्गे किंवा जुना बाजार मार्गे आणि दगडी पुलावरून जर पाणी वाहत असेल तर मग आंबेडकर पुतळा मार्गे मोठा वळसा घेऊन ये-जा करावी लागते. ही बाब लक्षात घेऊन खासबाग-मोमीनपुरा जोडण्यासाठी पुलाचे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाकडे देण्यात आलेला आहे. त्यावर कार्य व्हावे आणि हा नियोजित पूल तयार व्हावा, याकरिता आतापर्यंत दोन वेळा बिंदुसरा नदीमध्ये डुबकी लगाव आंदोलन केलेले आहे. यामुळे आमदारांना खळबळून जाग आली आणि त्यांनी फक्त कागदपत्रे घेऊन कधी अजित पवार तर कधी जयंत पाटलांना या प्रश्नी भेट घेतल्याचे तसेच पूल कम बंधारा बांधण्याची मोठ्या प्रमाणात हवा निर्माण केली परंतु त्यांचा कार्यकाळ संपला तरी त्यांना हा पूल बांधून घेता आला नाही. हा प्रश्न नव्वद गुणांचा होता परंतु तो त्यांना सोडवता आला नाही. दुसरा प्रश्न होता मोमीनपुरा भागात असलेल्या साडेचारशे वर्षांचा इतिहास लाभलेल्या ऐतिहासिक महेदवीया दायरा कब्रस्तान च्या दोन भिंती जीर्ण होऊन जमीन दोस्त झाल्याचा. त्या आमदार फंडातून बांधून द्याव्या याकरिता सुद्धा आमदार क्षीरसागर यांच्याकडे प्रश्न मांडला होता. यामुळे त्यांनी 23 जानेवारी 2023 रोजी आपल्या लवाजम्यासह कब्रस्तानात येऊन पाहणी केली. संरक्षक भिंत बांधून देण्याचे आश्वासन दिले. त्याला आता पावणेदोन वर्षे झाली तरीही कब्रस्तानची संरक्षक भिंत त्यांना काही बांधून देता आली नाही. हा प्रश्न फक्त दहा गुणांचा होता, तरीही तो त्यांना सोडवता आला नाही. अशाप्रकारे हे दोन्ही प्रश्न त्यांच्या जवळपास संपलेल्या कार्यकाळात त्यांना सोडविता न आल्याने ते शंभर टक्क्यांनी नापास झाल्याचे हे दोन्ही प्रश्न मांडणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.



आपला
एस.एम.युसूफ (मुक्तपत्रकार)
आसेफ़नगर, बीड
संपर्क - 9021 02 3121

## च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वीजजोडणीसाठी जलसमाधी आंदोलन संपन्न ; प्राथमिक आरोग्य केंद्रात सुविधांचा अभाव :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.१३ ) बीड तालुक्यातील च-हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र ८ वर्षांपूर्वी ५ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आले असुन सुरूवातीपासूनच वीज जोडणी अभावी प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत शोभेची वस्तू बनली असुन वारंवार आंदोलनानंतर वीज जोडणीसाठी मंजुर झालेला १६ लाख रुपयांचा निधी जिल्हा परिषद बांधकाम विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आणि जिल्हा आरोग्य अधिकारी बीड यांच्या हलगर्जीपणामुळे २ वेळा अखर्चित राहीलेला असुन काम न केल्याने निधी पडुन आहे.त्यामुळे संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी आणि प्राथमिक आरोग्य केंद्राला तातडीने वीज जोडणी करावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१४ सोमवार रोजी सकाळी ११ वाजता च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील "काकदरा साठवण"



तलावात जलसमाधी आंदोलन करण्यात येऊन लेखी आश्वासनानंतर आंदोलन तुर्तास मागे घेण्यात आले. यावेळी आंदोलनात प्रांताध्यक्ष शिवशक्ती,भिमशक्ति विचारमंच, शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, बप्पासाहेब पवार, मनोज तांदळे ग्रामपंचायत सदस्य, सुभाष बांगर,संपत नागरगोजे , सुर्यकांत नागरगोजे, हरिश्चंद्र जाधव, भगिरथ उबाळे आदि ग्रामस्थ सहभागी झाले होते.

निवेदन देशमाने, शाखा अभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद बीड , डॉ.सचिन शेकडे जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी जिल्हा परिषद बीड, तलाठी एम.एस.खांदे पोलिस उपनिरीक्षक कुकलारे एस आर व पोलीस कर्मचारी यांच्या मार्फत जिल्हाधिकारी ,जिल्हा आरोग्य अधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना देण्यात आले आहे.

सविस्तर माहितीस्तव

बीड तालुक्यातील च-हाटा येथे ८ वर्षांपूर्वी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ५ कोटी रुपये खर्चून प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत आणि अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधण्यात आली. पंचक्रोशीतील ग्रामस्थांना चांगल्या सुविधा मिळाव्यात. बीडला जाण्याचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागु नये हा उद्देश होता. मात्र ईमारतीचे बांधकाम झाल्यानंतर ईमारत आणि अधिकारी कर्मचारी निवासस्थाने यांना वीजजोडणी करण्यात आलीच नाही.त्यामुळे अधिकारी आणि कर्मचारी मुख्यालयी रहात नसल्याने रूग्णांना उपचारासाठी बीडला जावे लागते.वीजजोडणी अभावी प्रसूती, शस्त्रक्रिया,आंतररुग्ण विभाग या आरोग्य सुविधा मिळत नाहीत. विविध आंदोलनानंतर वीज जोडणी साठी मिळालेला १६ लाख रुपयांचा निधी २ वेळा अखर्चित :- डॉ.गणेश ढवळे

च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्राला वीज जोडणीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा यासाठी डॉ.गणेश ढवळे,शेख युनुस,सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार यांनी च-हाटा येथे रास्ता रोको आंदोलन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर २ वेळा धरणे आंदोलने केल्यानंतर जिल्हा आरोग्य अधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत च-हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी विद्युत रोहित्र बसविणे व ईतर संलग्न कामासाठी १६ लाख रुपयांचा निधी वर्ग करण्यात आलेला होता.परंतु अद्याप बांधकाम विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याने अद्याप वीज जोडणी करण्यात आलेली नाही. च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्रातील वीज जोडणी अभावी आरोग्य केंद्रातील असुविधांचे एकंदरीतच जिल्हा आरोग्य विभाग आणि बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना यांचे गांभीर्य दिसून येत नाही.

## अकोले शहरात फटाके वाजून महायुती सरकारचे राज्य पत्रकार संघाकडुन अभिनंदन!

### अकोले शहरात फटाक्यांची आतषबाजी, महायुती सरकारच्या निर्णयाचे पत्रकार संघाकडून उत्साहात अभिनंदन!

"महाराष्ट्र सरकारचा ऐतिहासिक निर्णय: पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाची स्थापना"

अकोले ( प्रतिनिधी ) महायुती सरकार ने ऐतिहासिक निर्णय घेत पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या महामंडळाच्या स्थापनेमुळे पत्रकारांना त्यांच्या रोजच्या कामकाजात आर्थिक मदत मिळणार आहे. वृत्तपत्र विक्रेत्यांनाही याचा फायदा होणार असून त्यांच्या व्यवसायाला एक नवीन दिशा मिळेल. पत्रकारांना अधिकृत कर्ज सुविधा, विमा योजनांचा लाभ, तसेच विविध सरकारी योजनांचा आधार मिळवून देण्यासाठी या महामंडळाची भूमिका महत्वपूर्ण ठरणार आहे. या महामंडळामुळे पत्रकारांना त्यांचे हक्क मिळवण्यासाठी आता शासनाकडे मदत मागावी लागणार नाही. पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांना आर्थिक पाठबळ मिळाल्याने त्यांच्या कामात सुसूत्रता आणि स्थैर्य येईल. असा विश्वास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी व्यक्त केला. पत्रकारांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाची स्थापना महायुती सरकारने केल्याचा आनंद पत्रकारांच्या वतीने फटाके फोडून व पेढे भरवून अकोले बसस्थानका समोर साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, हेमंत आवारी, विद्याचंद्र सातपुते, गणेश आवारी, भाऊसाहेब साळवे, संदीप दाताखीले, सचिन खरात, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, तालुका उपाध्यक्ष हरिभाऊ फापाळे, दत्ता जाधव, आदी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्यातील पत्रकारांचे हक्क आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने आयोजित केलेली पत्रकार संवाद यात्रा अखेर यशस्वी ठरली. या यात्रेची सांगता नुकतीच मुंबई येथील मंत्रालयात झाली, ज्यामध्ये पत्रकारांच्या हितासाठी एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र राज्य सरकारने पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची




घोषणा केली, ज्यामुळे या क्षेत्रातील लोकांना आर्थिक स्थैर्य लाभेल. संवाद यात्रेची पार्श्वभूमी: ही पत्रकार संवाद यात्रा नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमी येथून सुरु झाली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली, संपूर्ण महाराष्ट्रभर पत्रकार बांधवांनी ही यात्रा केली. विविध जिल्ह्यांमधून प्रवास करताना, त्यांनी पत्रकारांच्या समस्या आणि मागण्या मांडण्यासाठी सर्व आमदार, खासदार आणि विरोधी पक्ष नेत्यांशी संवाद साधला. महाराष्ट्रातील पत्रकारांसाठी सुरक्षा, आर्थिक मदत, आणि सामाजिक प्रतिष्ठा यांसारख्या मुद्द्यांवर या यात्रेदरम्यान ठोस चर्चा झाली. या संवाद यात्रेत, पत्रकार बांधवांनी प्रत्येक जिल्ह्यातील राजकीय नेत्यांना निवेदने सादर केली. त्यांनी पत्रकारांवरील हल्ले, कामाच्या कठीण परिस्थितीतील अडचणी आणि आर्थिक समस्यांबद्दल शासनाला सविस्तर माहिती दिली. यासोबतच, पत्रकार संवाद यात्रेच्या विविध पोस्टर्सचे अनावरण देखील करण्यात आले, ज्यात या मुद्द्यांवर अधिक जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. नेत्यांची भूमिका आणि स्वागत: या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष वसंत मुंडे, राज्य संघटक संजय भोकरे, राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे आणि कार्याध्यक्ष प्रविण सपकाळे यांनी मोठे योगदान दिले. चंद्रकांतदादा पाटील, मंगल प्रभात लोढा आणि पंकजा मुंडे यांसारख्या नेत्यांनी या संवाद यात्रेच्या समारोपाला उपस्थित राहून आपला पाठिंबा दर्शविला. पत्रकार संघाच्या या महत्वपूर्ण यशस्वी संवाद यात्रेमुळे राज्यातील पत्रकार वर्गात आनंदाची लहर पसरली आहे. महायुती सरकारच्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. हा निर्णय पत्रकारांच्या हक्कांसाठी उभे राहण्यासाठी एक नवीन आदर्श निर्माण करणारा ठरला आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने सर्व आमदार, खासदार, सर्वपक्षीय नेते, विरोधी पक्ष नेते तसेच सरकारमधील सर्व नेते आणि पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले जात आहे. महायुती सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे पत्रकार वर्गात उत्साह आणि आनंदाचे वातावरण आहे. यशस्वी संवाद आणि समन्वयाच्या दृष्टीने हे पाऊल स्वागतार्ह आहे, ज्यामुळे पत्रकारिता क्षेत्राला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पत्रकार संवाद यात्रेने पत्रकारांचे हक्क आणि समस्या सोडवण्याच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाच्या स्थापनेमुळे पत्रकारांना आता अधिक सुरक्षित आणि आर्थिक स्थिर जीवन मिळण्याची संधी उपलब्ध झाली आहे. पत्रकार संघाच्या या यशस्वी प्रयत्नांमुळे महाराष्ट्रातील पत्रकारिता क्षेत्राच्या भविष्याला नवीन दिशा मिळाली आहे, ज्यामुळे पत्रकारांच्या हक्कांच्या लढ्यात हा एक मोठा विजय मानला जात आहे.

## लाडक्या बहिणींना महायुती सरकारकडून ५५०० रुपयांचा बोनस.

प्रतीनिधी: राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना दिवाळीसाठी एक खास गिफ्ट देण्याची घोषणा केली आहे. सरकारने असे जाहीर केले आहे की, दिवाळीच्या सणानिमित्त योजनेच्या सर्व पात्र महिलांना 3000 रुपयांचं बोनस दिलं जाईल. लाडकी बहिण योजना . महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मुली व महिलांना दरमहा 1500 रू दिले जाणार आहेत. तर ही मदत महिलांचे आरोग्य व पोषण आणि त्यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी दिले जाणार आहे. तर महिलांचा श्रम सहभाग पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. ज्यामुळे त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर परिणाम होतो. सदर परिस्थिती लक्षात घेऊन, राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्याची "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजना सुरू केली आहे. राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना दिवाळीसाठी एक खास




गिफ्ट देण्याची घोषणा केली आहे. दिवाळीच्या सणानिमित्त योजनेच्या सर्व पात्र महिलांना 3000 रुपयांचं बोनस दिलं जाईल. ही रक्कम महिन्याला नियमित मिळणारे पैसे वगळून दिली जाईल. काही निवडक महिलांना 2500 रुपयांची अतिरिक्त रक्कमही दिली जाईल. याप्रकारे काही महिलांना एकूण 5500 (3000+2500) रुपयांचा लाभ मिळणार आहे. दिवाळीचा बोनस फक्त लाडकीबहीण योजनेच्या पात्र महिलांनाच मिळणार आहे. यासाठी या अटी पूर्ण कराव्या लागतील. महिलेचं नाव लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी सूचीत असलं पाहिजे.
*त्यांनी योजनेच्या माध्यमातून कमीत कमी तीन महिन्यांचा लाभ घेतला पाहिजे.
*त्यांचा आधार कार्ड आणि बँक खाते लिंक असलेलं पाहिजे.

प्रत्यक्ष अर्ज कसा करावा? मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेचा लाभ तुम्हाला घ्यायचा आहे पण तुमच्या जवळ मोबाईल फोन नाही किंवा तुम्हाला या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करता येत नाही त्यासंदर्भात तुम्ही खालील दिलेल्या प्रक्रियेनुसार तुम्ही स्वतःचा प्रत्यक्ष अर्ज सादर करू शकतात, त्याची प्रक्रिया खालील प्रमाणेलाडकी बहीण योजनेचा प्रत्यक्ष अर्ज करण्यासाठी तुम्हाला योजनेचा आवश्यक कागदपत्रे तयार करून तुमच्या जवळच्या ग्रामपंचायत/सेतू केंद्र/ अंगणवाडी केंद्र/महिला व बालकल्याण विभाग या कोणत्याही एका ठिकाणी जाऊन या योजनेसाठी तुम्ही प्रत्यक्ष अर्ज सादर करू शकताह, या कार्यालयाच्या अधिकाऱ्याद्वारा आपले अर्ज योजनेच्या अधिकृत पोर्टल मार्फत ऑनलाईन केले जाईल काही दिवसानंतर कार्यालयाला त्यांना भेट देऊन अर्जाची पावती मिळू शकेल.

## परळीच्या राजस्थानी मल्टीस्टेट कडून नांदेडकरांनाही चार कोटी ४७ लाख ७४ हजारांला फसवले!! मल्टीस्टेटच्या संचालकांसह कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल!!!

उमरखेड: उमरखेड येथे दिड वर्षभरापूर्वी सुरु झालेल्या राजस्थानी मल्टीस्टेट को -ऑपरेटीव्ह सोसायटी लिमिटेड परळीने ग्राहकांना ठेवी रक्कमेवर जास्त व्याज देण्याचे आमिष दाखवून ४ कोटी ४७ लाख ७४ हजार रुपयाने फसवणूक केल्याने तक्रारकर्त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी संचालक मंडळाच्या १५ जणांवर गुन्हे दाखल केल्याने एकच खळबळ उडाली आहे. मानधन तत्वावर नियुक्ती ही तर फसवणूक उमरखेडमधील लघु व्यवसायिक गणेश लक्ष्मण शिंदे यांनी मागील वर्षी मे २०२३ मध्ये राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. शाखा उमरखेडचे शाखाधिकारी विजय खंदारे व राजस्थानी मल्टीस्टेट को. ऑपरेटिव्ह सोसायटी लि. चे कर्मचारी छापील पत्रक घेऊन श्रीराम वर्क शॉप ढाणकी रोड उमरखेड या दुकानावर आले. त्या छापील पत्रकावर असल्याप्रमाणे शिंदे यांना डिपॉझीटवर जास्त व्याजदराचे आमिष दाखवून त्यांच्या उमरखेड शाखेत मला पैसे भरण्याचा आग्रह केला. त्यांनी त्यांच्या बँकेत भरलेल्या पैशावर 85 टक्के पर्यंत कर्ज देणार असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांनी उमरखेड शाखेत खाते उघडून त्यांच्याकडून एकूण पंचवीस लाख सतरा हजार एकशे पंच्यान्नव रूपये रक्कम एक वर्षासाठी राजस्थानी मल्टीस्टेट को. ऑपरेटिव्ह सोसायटी लि. उमरखेड शाखा येथे एफडी केली. एफडी मॅचुयर झाल्यावर ते पैसे काढण्यासाठी राजस्थानी मल्टीस्टेट को. ऑपरेटिव्ह सोसायटी लि. उमरखेड शाखा येथे गेले असता हेड ब्रान्च ऑफीस मधून पैसे मिळत नसल्याने आंम्ही पैसे देऊ शकत नाही, तुम्ही तुमचे पैसे सेविंग खात्यात ट्रान्फर करा म्हणजे ते पैसे कधीही काढता येतील, असे शाखा मॅनेजर विजय खंदारे यांनी सांगितले. त्यानंतर खंदारे यांनी एफडीचे पैसे एकूण पंचवीस लाख रूपये परस्पर त्यांच्या सेवींग खात्यावर वळते केले. त्यानंतरही शिन्दे यांनी पैसे परत मिळण्यासाठी वारंवार राजस्थानी मल्टीस्टेट को. ऑपरेटिव्ह सोसायटी लि. शाखा उमरखेड येथे गेले असता त्यांना हेड ऑफीस/मेन ब्रांच मधुन पैसे परत मिळत नाहीत, असे कारण सांगून त्यांचे पैसे परत केले नाहीत. त्यांच्या प्रमाणेच उमरखेड तालुक्यातील व परिसरातील अनेक खातेदारांचीही एकूण ४ कोटी ४७ हजाराची आर्थिक फसवणूक केली. याप्रकरणी संचालक मंडळातील १५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे 1) अध्यक्ष चंदुलाल मोहनला बियाणी, 2) उपाध्यक्ष बालचंद्र लोढा, 3) सचिव बद्रीनारायण बाहेती, 4) सहसचिव प्रल्हाद अग्रवाल, 5) कोषाध्यक्ष विजय लड्डा, 6) संचालक अशोक जाजू, जाजू, 7) संचालक सतीश सारडा, 8) संचालक अजय पुजारी, 9) संचालिका सौ. प्रेम लता बाहेती, 10) संचालिका सौ. कल्पना बियाणी, 11) संचालक नामदेवारा रोडे, 12) संचालक जगदीश बियाणे, 13) मुख्य कार्यकारी अधिकारी व्यंकटेश कुलकर्णी, 14) उमरखेड शाखा मॅनेजर विजय खंदारे, 15) उमरखेड शाखा कॅशियर भक्ती सतिष डागा, अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या १५ जणांची नावे आहेत.

## आ.लक्ष्मण आण्णांनी आणेलेले प्रत्येक काम दर्जेदारच होईल यांची काळजी घेतली- शिवराज पवार

### शासकीय विश्रामगृहाच्या नविन बांधकाम इमारतीचे शिवराज पवारांच्या हास्ते उद्घाटन संपन्न

### मंगळवारी मतदारसंघातील 65 कोटीच्या सिमेंट रस्ता कामांचे आज होणार उद्घाटन

तलवडारोड ते रेवकी देवकी गोदी रस्ता,रामपुरी ते ढालेगाव रस्ता,सुर्डी फाटा ते सेलु रस्ता, लोणाळा ते सिदफणा चिंचोली रस्ता, जातेगावरोडतेमुदापुरीरस्ता,सावरगावतेचिखलीरस्ता,चंकलंबारोडतेब्रम्हगावरस्तावरीलसर्वगावातीलरस्तेमिळुन 40 कि.मी. रस्त्यासाठी आ.लक्ष्मण पवारयांच्याप्रयत्नातूनमंजुरीमिळालीआहेत्यासिमेंटरस्ताकामांचाआ.लक्ष्मणपवार, वशिवराजपवार, यांच्याहास्तेआजमंगळवारीउद्घाटनहोणारआहे ,,,,,

गेवराई: मतदारसंघातील जनतेने आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला तेव्हा पासून आ.आण्णांनी मतदार संघाची प्रमाणीक पणे सेवा करत मतदारसंघातील प्रत्येक काम पारदर्शकणे केले आहे त्यासाठी आण्णांनी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून आणला आज मतदारसंघात मोठ्या प्रमाणात कामे सुरू असून गेवराई विधानसभा मतदारसंघाचे महाराष्ट्रात नाव मोठे व्हावे हेच आमच्या पवार कुटुंबाचे ध्येय आसल्याचे शिवराज पवार यानी उद्घाटन प्रसंगी बोलतांना सागितले मतदारसंघाचेआ. लक्ष्मण {आण्णा} पवार यांच्या विशेष प्रयत्नातून आज दि.13 रोजी शिवराज पवार यांच्या शुभहस्ते गेवराई येथील नवीन शासकीय विश्रामगृह इमारतीचा भूमिपूजन सोहळा पार पडला

यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश सुरवसे,शिवसेनेचे तालुकाध्यक्ष शिनुभाऊ बेदरे, सुशील जवंजाळ, मधुकर तौर, अय्युब बागवान राजेंद्र राक्षसभुवनकर, भगवान घुंबार्डे, राहुल खंडागळे,दादासाहेब गिरी, जान मोहम्मंद बागवान,नगरसेवक कृष्णा काकडे, राजाभाऊ आर्दड, भरत गायकवाड, आप्पासाहेब कानगुडे, संजय इंगळे,न किशोरजी धोंडलकर, फिरोज शेठ, मुन्ना शेठ, राम पवार, मा.उपनगराध्यक्ष मधुकर आप्पा वादे, सतीश दाभाडे सरपंच नंदू गरड,शिराळाचे सरपंच माऊली जाधव, ज्ञानेश्वरजी पवार,बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण,विष्णुपंत आतकरे,राजेभाऊ मातकर, शरद मोटे,गणेश मोटे,विठ्ठल मोटे, समाधान मस्के,कदीरभाई बागवान, बेदरे,करण जाधव,अमोल मस्के,माजेद भाई,गोरख मोटे,मुन्ना मोटे, रंजीत डरपे,ऋषिकेश मोटे,मुस्ताक भाई कुरेशी, मोंटी माटे,अरुण पवार,गणेश पवार,संतोष राठोड,आसेफ काजी,शेख उस्मान,फाहत भाई चाऊस,शोएब भाई,कृष्णकांत पाटील, रोहितजी राठोड,विष्णुपंत शेलार,मुरली अण्णा सुतार, दिपक शेलार,इमरान भैया पठाण,बळीभाऊ करे,विलास शिंदे,रविराज आहेर,विक्रम भोसले,योगेश मोटे,रमेश राठोड,सुंदर धस,योगेश मोटे,बाबभाई फिटर,जफर टेलर,सादेक चाचू,शेख नईम,प्रल्हादजी येळापुरे,संजय आंधळे कृष्णा पाटोळे व इतर कार्यकर्ते आणि पदाधिकारी तसेच समस्त गेवराई कर उपस्थित होते



# बाबरी मुंडेंची दोनच आठवड्यात माजलगावात क्रेज वाढली.



## तरुण नेतृत्वाच्या संवाद दौऱ्याला मिळतेय तरुणांची साथ;थोरा मोठ्यांचा आशीर्वाद.

**माजलगाव प्रतिनिधी दि.14**
वडवणी तालुक्याच्या राजकारणात समाजकारणात नंबर एकवर बाबरी मुंडे यांचे नाव गनल्या जाते.असा 'युथ आयकॉन'असणारा हा चेहरा येता विधानसभेच्या अनुषंगाने माजलगाव तालुक्यातही सक्रिय झाला आहे.दरम्यान दोनच आठवड्यात त्यांनी आपली क्रेज याठिकाणी निर्माण केली आहे. तालुक्यात तब्बल 50 गाववस्तीवर त्यांनी आपला संवाद दौरा पूर्ण केला आहे.या झंजावती दौऱ्यात हजारो तरुणांची साथ भेटत असून गावागावात वस्तीवस्तीवर त्यांना थोडामोठ्यांचा आशीर्वाद,उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. स्व.गोपीनाथराव मुंडे,आ. पंकजा मुंडे यांचे निकटवर्ती म्हणून राजाभाऊ मुंडे व त्यांचे पुत्र बाबरी मुंडे यांचे नाव आहे. वडवणी तालुक्यातील राजकारणात समाजकारणात त्यांचा प्रभाव आहे.जिल्हाभर त्यांची ओळख आहे.'युथ आयकॉन'म्हणून बाबरी मुंडेनी आपली ओळख तरुणांच्या मनात निर्माण केली आहे.दरम्यान जिल्ह्यात मराठा ओबीसी असा राजकीय वाद टोकावर पोहोचला आहे.अशा स्थितीत माजलगाव विधानसभेत प्रभावी ओबीसी चेहरा असणाऱ्या नेतृत्वाला नशीब आजमावण्याची संधी आहे.याच पार्श्वभूमीवर ओबीसी प्रभावी चेहरा म्हणून बाबरी मुंडे यांनी माजलगाव विधानसभेत आपले नशीब आजमावण्यास सुरुवात केली आहे.बोलका,हसता खेळता मनमोकळा स्वभाव,येथील तरुणांना फक्त दोनच आठवड्यात लक्षात आला.त्यामुळे शितावरून भाताची परीक्षा झाली असल्याने बाबरी मुंडे यांनी येथे आपली क्रेझ निर्माण केली आहे.हजारो तरुण त्यांना येऊन भेटत आहेत. माजलगाव तालुक्यातील बडेवाडी, नित्रुड, सुलतानपूर,नाकलगाव, पिंपळगाव,दिंद्रूड,रामनगर तांडा, मोठेवाडी, हनुमान नगर,पवारवाडी, कल्याण नगर,सिद्धेश्वर नगर,खरात आडगाव,हनुमान नगर तांडा, निपाणीटाकळी,वसंत नगर तांडा,शुक्लतीर्थलिंमगाव,सोन्नाथडी,गुंजथडी,सुरूमगांव,गंगामसला, आडोळा,सरवर पिंपळगांव, आबेगाव,छत्र बोरगाव,सिमरी पारगाव,जीवनापूर नाथनगर तांडा,साळेगाव,देवळा,कोथरूळ, पुरुषोत्तमपुरी,माळेवाडी,महातपुरी, वाघोरा,किट्टीआडगाव,गोविंदवाडी, लऊळ नं.1,पात्रूड,शिंदेवाडी, लहामेवाडी,गुजरवाडी,शेंडगेवस्ती ई.50 गाव वस्ती,वाडी,तांड्यावर आपला संवाद झंजावती दौरा त्यांनी पोहोचवला आहे.या झंजावाती संवाद दौऱ्याला,या तरुण नेतृत्वाला तरुणांची प्रचंड साथ भेटत आहे. थोरामोठ्यांचा आशीर्वाद भेटत आहे.गावागावात नागरिकांकडून त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केल्या जात आहे.दरम्यान दोनच आठवड्यात बाबरी मुंडे यांनी विधानसभेचा प्रभावी चेहरा म्हणून आपली क्रेज याठिकाणी निर्माण केली आहे.त्यामुळे अनेक प्रस्थापित राजकारण्यांचे धाबे दनानले आहेत.





जनसामान्य माणसांचे हक्काचे व्यासपीठ साप्ताहिक लोक इच्छा वृत्तपत्राचे समद रज्जाक शेख .बीड तालुका प्रतिनिधी म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांना पुढील वाटचालीसाठी मन पूर्वक हार्दिक शुभेच्छा

## राज्यात ३४५ पाळणाघरे, सेविका, मदनिसांची नियुक्तीही होणार...!

पुणे : केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'मिशन शक्ती' योजनेतील सामर्थ्य कार्यक्रमातील राज्यात पाळणाघर (अंगणवाडी कम क्रेश) योजना राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार ३४५ पाळणाघरे सुरू करण्यात येणार असून, त्यात पाळणाघर सेविका, पाळणाघर मदतनीस असे प्रत्येकी एक पद निर्माण करण्यात येणार आहेत. महिला आणि बालविकास विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. केंद्र शासनाच्या महिला आणि बालविकास विभागाकडून राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर योजना राबवण्यात येत होती. मात्र केंद्र सरकारने या योजनेचे राष्ट्रीय पाळणाघर योजनेमध्ये रूपांतर करून एकात्मिक बालविकास सेवा योजनेत त्याचा समावेश केला. त्यानुसार २०२२ मध्ये पाळणाघरे सुरू करण्याबाबतचे आदेश देऊन २०२३ मध्ये सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. त्यासाठी केंद्र आणि राज्य हिश्श्याचे प्रमाण अनुक्रमे ६० आणि ४० टक्के आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने पहिल्या टप्प्यात ३४५ पाळणाघरे सुरू करण्यास मान्यता दिली आहे. पाळणाघर योजनेत प्रति पाळणाघर वार्षिक खर्च ३ लाख ३६ हजार ६०० रुपये आहे. त्यात पाळणाघरातील अंगणवाडी सेविका यांना १५०० रुपये भत्ता, अंगणवाडी मदतनीस यांना ७५० रुपये भत्ता, पाळणाघर सेविका यांना ५५०० रुपये, पाळणाघर मदतनीस यांना ३००० रुपये मानधन दिले जाणार आहे. तसेच पूर्वशालेय घटक संच, पोषण आहार, औषधे संच, खेळणी दिली जाणार आहेत. पाळणाघर भाड्यासाठी महानगर क्षेत्रासाठी १२ हजार रुपये, तर महानगर क्षेत्र वगळता उर्वरित क्षेत्रासाठी ८ हजार रुपये भाडे निश्चित करण्यात आले आहे. पाळणाघर उभारणीसाठी एकवेळ ५० हजार रुपये देण्यात येणार आहेत. तसेच योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येणार आहे. पाळणाघर सेविका, मदतनीस यांच्या नियुक्तीबाबतच्या, योजना कार्यान्वित करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे दिल्या जातील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी विविध स्तरांवर समित्या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी विविध स्तरांवर समित्यांची रचना करण्यात आली आहे. त्यात महिला आणि बालविकास विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सुकाणू समिती, एकात्मिक बालविकास सेवा योजना विभागाचे आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्तालय स्तरावरील समिती, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती, तर अंगणवाडी सेविका यांच्या अध्यक्षतेखाली पाळणाघर स्तरावर समिती नियुक्त करण्यात आली आहे.



आज शहरातील मोमीनपुरा भागातील कुरेशी हॉल च्या पाठीमाग ची गल्ली येथील अंतर्गत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम कामाचे उद्घाटन करतांना भावी आमदार डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर यांचे शुभ हाताने उद्घाटन केले, आमचे मार्गदर्शक डॉ.सारिका ताई क्षीरसागर, या वेळी उपस्थित, मुफ्ती कासिम, मतीन भाई कुरेशी, अन्वर खान, साजेद जहागीरदार, मिलिंद ठोकळ, बबन वाघमारे, अलीम कुरेशी, सत्तार कुरेशी, सलीम कुरेशी, अब्दुल रहीम कुरेशी, सर्व मित्र परिवार उपस्थित होते.........



लोकसभा निवडणुकीनंतर राज्यातील जनतेचे लक्ष महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांकडे लागले आहे. अखेर आज (15 ऑक्टोबर) दुपारी 3.30 वाजता केंद्रीय निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद पार पडणार आहे. या पत्रकार परिषदेत महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांची घोषणा केली जाणार आहे. त्यामुळे आता राजकीय घडामोडींना वेग आला आहे. संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर करण्यात येणार आहे. एएनआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, केंद्रीय निवडणूक आयोगाची आज दुपारी पत्रकार परिषद आहे. दुपारी 3.30 मिनिटांनी ही पत्रकार परिषद सुरू होईल.

# ठाकरे गटाच्या शिवसेनेची अंबाजोगाई तालुका आढावा बैठक संपन्न.

अंबाजोगाई : शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री माननीय उद्धवजी ठाकरे साहेब, युवा सेना प्रमुख माजी मंत्री आदित्य ठाकरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना नेते सुनील प्रभू साहेब, मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथ नेरूरकर साहेब, उपनेत्या माननीय सुषमाताई अंधारे, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब, लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनील दादा धांडे,



सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची विधानसभा निवडणुक संदर्भात आढावा बैठक दिनांक 14/10/2024 रोजी अंबाजोगाई येथे जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडली.यावेळी बैठकीला जिल्हा समन्वयक अनिल देशमुख सर, अंबाजोगाई तालुका प्रमुख श्रीधर गरड, शहर प्रमुख अशोक हेडे,महिला आघाडीच्या डॉ नयना ताई सिरसट,जयश्रीताई पिंपरे, जोगदंड ताई, मोरेताई,युवासेना उपजिल्हाप्रमुख अक्षय कदम, विष्णू धायगुडे, माजी तालुका प्रमुख जालिंदर आपेट, माजी युवा सेना जिल्हा प्रमुख वैभव आजले, दता तांदळे, दुलबा पठाण, सुडे वसंत, माने अर्जुन, जाधव बाबा भिसे सह शिवसैनिक उपस्थित होते.. सदर बैठकीत विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विचार मंथन करण्यात आले. विधानसभा निवडणुकीची रणनीती ठरविण्यात आली.

## उदघाटन समारंभ...............

आज बीड तालुक्यातील कुटेवाडी येथील १कोटी २० लक्ष रु चा विकास निधी गावाबाहेरील वस्त्यांचे रस्ते करण्यासाठी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा गावचे सरपंच गणेश भाऊ वरेकर यांच्या पाठपुराव्याने उपलब्ध झाला असून त्या कामाचे उदघाटन शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या शुभहस्ते व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला, यावेळी बोलताना दोन्ही जिल्हाप्रमुख व तालुकाप्रमुख यांनी सांगितले की, बीड विधानसभा मतदारसंघातील विविध गावातील



विकासकामे हाती घ्यावयाची असुन ,लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष कटिबद्ध आहे.लवकरच महाराष्ट्रात सत्ताबदल होणार असून उद्धव बाळासाहेब ठाकरे पुन्हा मुख्यमंत्री होणार आहेत व महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येणार आहे येणाऱ्या काळात बीड मतदारसंघात व जिल्हात खुप मोठा विकास व सर्वसामान्य गोरगरीब जनतेसाठी कामं केली जाणार आहेत , या कार्यक्रमाला गावातील उपसरपंच,ग्रा.प.सदसय , शाखाप्रमुख, गावकरी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आज भगवान विद्यालय धानोरा रोड बीड जवळील महात्मा फुले नगर मधील रस्ते कामाचे उद्घाटन भावी आमदार डॉ. योगेशभैय्या क्षीरसागर यांच्या हस्ते झाले. यावेळी, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजनेच्या पैठण तालुकास्तरीय सदस्यपदी संतोष लालसिंग राठोड

ग्रामविकास विभागाच्या अंतर्गत शासनाच्या अशासकीय समितीच्या सदस्य संतोष लालसिंग राठोड यांची तीन वर्षासाठी निवड करण्यात आली आहे यामध्ये संत सेवालाल महाराज बंजारा लमान तांडा समृद्धी योजना अमलबजावणी बाबत बंजारा लमान तांडा वस्ती घोषित करणे गावठाण जाहीर करणे तांड्याला महसुली गाव घोषित करण्याची कारवाई करणे ग्रामपंचायत स्थापन करण्याची कारवाई करणे व इतर अनुषंगित कारवाईसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आले असून सदरहून योजनेअंतर्गत करावयाच्या कामाची ग्रामपंचायतीकडून प्राप्त झालेले प्रधान क्रम व निवड लक्षात घेऊन कामाची निवड करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये बंजारा समाजाचे अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आले आहेत ही बाब विचारात घेऊन गटविकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये बंजारा लमान समाजाच्या अशासकीय पैठण तालुकासदस्यांची तीन वर्षाकरितांना



नेमणूक करण्यात आली आहे. असलेल्या पैठण तालुका समितीच्या सदस्यपदी बंजारा समाजाचे तरुण तडफदार नेतृत्व संतोष राठोड यांची पैठण तालुका अशासकीय सदस्य पदी निवड करण्यात आली आहे गेल्या अनेक वर्षापासून समाजाच्या हितासाठी कायम तात्पर राहून सामाजिक जपणारे युवा नेतृत्व म्हणून संतोष राठोड हे सिद्ध झाले आहेत संतोष लालसिंग राठोड यांची निवड करण्यात आल्याने सर्व तालुका व जिल्ह्यामध्ये त्यांची कौतुक होत असून पुढील कार्यासह शुभेच्छा दिल्या जात आहे

# पाटोधातील जुने शिक्षण सम्राट आणि सहकार महर्षी रामकृष्ण बांगर, सत्यभामा बांगरसह ४१ जनाविरुद्ध १३ कोटी पेक्षाही जास्त रकमेच्या अपहारप्रकरणी गुन्हे दाखल.

## बीडचे जिल्हा विशेष लेखापरीक्षक भोसले यांनी केली तक्रार दाखल!!

.बीड/प्रतिनिधी: बीडचे जिल्हा निबंधक यांच्या आदेशानुसार जिल्हा विशेष लेखापरीक्षक भोसले यांनी पाटोदा येथील महात्मा फुले अर्बन कॉ ऑप बँक लि. चे तीन वर्षाचे लेखापरीक्षण केले असता कागदपत्र न घेता विविध संस्थांना वाटप केलेल्या 13 कोटी 21 लाख 60 हजार 25 रुपये एवढ्या रकमेचा अपहार व गैरव्यवहार झाल्याचा अहवाल जिल्हा निबंधकांना दिल्यानंतर जिल्हा निबंधकाच्या निर्देशानुसार लेखापरीक्षक भोसले यांनी पाटोदा पोलीस ठाण्यात या अपहार प्रकरणी रीतसर तक्रार दाखल केल्यानंतर तब्बल 41 आरोपीविरुद्ध पाटोदा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबतची सविस्तर माहिती असेल की, पाटोदा येथील शिक्षण सम्राट आणि सहकार महर्षी म्हणून ओळखले जाणारे रामकृष्ण बांगर यांची महात्मा फुले को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक कार्यरत आहे. सदरील बँकेने कुठलेही कागदपत्र न घेता विविध सहकारी संस्थांना कर्ज वाटप केलेले आहे. जवळजवळ 13 ते 14 कोटींचे कर्ज वाटप करताना कसलाही नेम न पाळता कोट्यावधी रुपयांचा अपहार करण्यात आल्याची लेखापरीक्षणात उघड झाल्यामुळे, विशेष लेखा परीक्षकांनी बँकेचे संचालक मंडळ व संबंधित कर्जदारांवर अपहाराचा गुन्हा दाखल केल्यानंतर बीड जिल्ह्याच्या सहकाराने बँक क्षेत्रात एकच खळबळ माजली आहे. वरील गुन्ह्यातील आरोपीमध्ये संदीप सानप, बाळू पवार ,भाऊसाहेब सोनसळे, तुकाराम बावणे, भगवान शिंदे, श्रीरंग सानप, श्रावण बांगर, संजय सगळे, संभाजी मस्कर, भगवान पाखरे, भगवान सोनवणे राजेंद्र गवळी, नवनाथ नागरगोजे पांडुरंग मस्के, रुक्मिणी बांगर, रफिक पठाण, सीताबाई जावळे रामकृष्ण मारुती बांगर बाळासाहेब राख, रणजीत चौरे, सुरेश पुराणिक, प्रदीप दत्तात्रय कुलकर्णी, भीमराव सानप, दिनकर बांगर, शामराव कंठाळे (मयत ),विष्णू थोरवे, महादेव बांगर, राजाभाऊ बावणे, बाळासाहेब बांगर ,लक्ष्मण शिंदे नवनाथ नागरगोजे , बाबासाहेब नागरगोजे, हनुमंत भोसले, प्रभाकर गीते ,प्रदीप गिरे ,रवींद्र उगले, जनार्धन कंठाळे, गुलान भाई मेंगडे ,रामचंद्र रांजवण, संजय सानप, सत्यभामा रामकृष्ण बांगर आदींचा समावेश आहे. तक्रारीमध्ये ज्या 14 संस्थाचा जिल्हा विशेष लेखापरीक्षकांनी उल्लेख केला आहे त्यात प्रगती जिनिंग चुंबळी, चंद्रभागा दूध संस्था, ज्योतिर्लिंग दूध संस्था ,सिताराम बाबा दूध संस्था, सुशिक्षित बेकार दूध संस्था ,महात्मा फुले दूध संस्था ,नवनाथ दूध संस्था, श्रीकृष्ण दूध संस्था, जय किसान दूध संस्था ,जागृती दूध संस्था, सावित्रीबाई फुले दूध संस्था, भगवान बाबा ट्रेडर्स ,पाटोदा तालुका दूध सहकारी संघ आदी संस्थांचा समावेश असल्याचे लेखा परीक्षकांनी आपल्या फिर्यादीत म्हटले आहे. वरील रकमेच्या अपहरप्रकरणी पाटोदा पोलिसांनी एकूण 41 आरोपी विरुद्ध कलम 420, 406, 409 ,467 ,468 ,471, 34 प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. यामधील सत्यभामा बांगर यांना अटक केली असली तरी, यातील बरेच आरोपी फरार आहेत.

# नाशिकमधील सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयातील दोन कर्मचारी दहा हजार रुपयाच्या लाच प्रकरणात एसीबीच्या जाळ्यात.

नाशिक : दहा हजार रुपयाच्या लाच प्रकरणात व्दारका येथील सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयातील लीपीक (निरीक्षक) सुमंत सुरेश पुराणीक, लघुलेखक संदीप मधुकर बावीस्कर हे लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकले. या कारवाईबाबत एसीबीने दिलेली माहिती अशी की, तक्रारदार यांचेकडे नविन दाखल फाईलच्या नेमलेल्या तारखा देणे, सुनावणी कामकाजात अडवणुक न करणे, निकाली फाईल नकला विभागाला विहीत वेळेत पाठविले बददल, व येणा-या पुढील सुनावणीचे कामकाजात अडथळा न आणता सदर कामकाज जलद गतीने करुन देणेचे मोबदल्यात सुमंत सुरेश पुराणीक यांनी पंच साक्षीदार यांचे समक्ष २३ सप्टेंबर रोजी लाचेची मागणी केली. त्यावेळेस पडताळणी कारवाई दरम्यान प्रथम २० हजार रुपये लाचेची शासकीय पंचांसमक्ष फिर्यादी/तक्रारदार यांचेकडे मागणी करुन, तडजोडी अंती १५ हजार रुपये लाचेची मागणी केली, सदर लाच मागणीस दीप मधुकर बावीस्कर यांनी प्रोत्साहन दिले असून सदरची लाच रक्कम आज १ ऑक्टोंबर रोजी सुमंत सुरेश पुराणीक यांनी त्यांचे शासकीय कार्यालयात पंच साक्षीदार यांचे समक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन मुंबईनाका, नाशिक शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 'तक्रारदार-' पुरूष वय-43 आलोसे- १) सुमंत सुरेश पुराणीक वय 40 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-न्याय लिपीक (निरीक्षक), वर्ग-३, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, दवारका नाशिक, रा. श्री निधी बंगला, डी जी पी नगर-1, रेयॉन स्कुल जवळ, नाशिक पुणे रोड, नाशिक २) संदीप मधुकर बावीस्कर वय ४७ वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-लघुलेखक, वर्ग-२(अराजपत्रीत) धर्म दाय उप-आयुक्त, नाशिक रा. एन ४२, जे.सी. २/२/५ रायगड चौक, सिडको नाशिक'लाचेची मागणी- १५०००/- 'लाच स्विकारली-१००००/-'हस्तगत रक्कम-१००००/-'लालेची मागणी दि.२३/०९/२०२४'लाचस्विकारली–दि.०१/१०/२०२४ तक्रार-तक्रारदार यांचेकडे नविन दाखल फाईलच्या नेमलेल्या तारखा देणे, सुनावणी कामकाजात अडवणुक न करणे, निकाली फाईल नकला विभागाला विहीत वेळेत पाठविले बददल, व येणा-या पुढील सुनावणीचे कामकाजात अडथळा न आणता सदर कामकाज जलद गतीने करुन देणेचे मोबदल्यात लोकसेवक श्री सुमंत सुरेश पुराणीक यांनी पंच साक्षीदार यांचे समक्ष दिनांक 23/09/2024 रोजी लाच पडताळणी कारवाई दरम्यान प्रथम 20,000/- रुपये लाचेची शासकीय पंचांसमक्ष फिर्यादी/तक्रारदार यांचेकडे मागणी करुन, तडजोडी अंती 15000/- रुपये लाचेची मागणी केली, सदर लाच मागणीस आलोसे क्र. २ यांनी प्रोत्साहन दीले असुन, सदरची लाच रक्कम आज दिनांक 01/10/2024 रोजी आलोसे क्र.१ यांनी त्यांचे शासकीय कार्यालयात पंच साक्षीदार यांचे समक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन, त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन मुंबईनाका, नाशिक शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आलोसे यांचे सक्षम अधिकारी-मा. धर्मदाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई, ससमीरा बिल्डींग, वरळी मुंबई – 18

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

मंगळवार १५ ऑक्टोबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4




# कोणत्याही क्षणी विधानसभा निवडणुकीचं बिगुल वाजणार!

## महायुतीची पहिली यादी आज जाहीर होण्याची शक्यता



कोणत्याही क्षणी महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीतं बिगुल वाजणार आहे. येत्या एक ते दोन दिवसात महाराष्ट्रात आचारसंहिता लागू शकते. अशातच सर्वच राजकीय पक्ष जोमाने कामाला लागलेत. जागावाटपांसाठी बैठकांचं सत्र सुरु आहे. अशातच आता महायुतीची पहिली यादी जाहीर होण्याची शक्यता आहे. आज दुपारी 2. 30 मिनिटांनी महायुतीची पत्रकार परिषद होणार आहे. या पत्रकार परिषदेत पहिली उमेदवार यादी जाहीर केली जाण्याची शक्यता आहे. आज दुपारच्या पत्रकार परिषदेत महायुतीकडून उमेदवारांची नावं जाहीर केली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता या पहिल्या यादीत कुणाची वर्णी लागणार हे पाहणं महत्वाचं असणार आहे. 100 जागांवर भाजपची नावं निश्चित विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार भाजपचे वरिष्ठ नेते, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेण्याची शक्यता आहे. अमित शाहांसोबत चर्चा केल्यानंतर संपूर्ण जागावाटप जाहीर होण्याची शक्यता आहे. भाजपच्या 100 उमेदवारांची नावं जवळपास निश्चित झाली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तर काही जागांवर महायुतीत अदलाबदल होऊ शकते. राज्यपाल नियुक्त 12 जागांसाठी महायुतीने नावं पाठवली राज्यपाल नियुक्त 12 जागांबाबत महायुतीने नावं पाठवल्याची माहिती आहे. 12 पैकी 7 जागांसाठी महायुतीने नावं राज्यपालांकडे पाठवल्याची माहिती आहे. भाजपचे 3, शिवसेना शिंदे गट 2 तर अजित पवार गटाकडून 2 नावं पाठवल्याची माहिती आहे. आज राज्यपाल याबाबतचा निर्णय घेण्याची शक्यता आहे. आजच या आमदारांचा शपथविधीदेखील होण्याची शक्यता आहे.

### महायुतीने कुणाची नावं पाठवली

भाजपकडून चित्रा वाघ, विक्रांत पाटील यांची नावं निश्चित झाल्याची माहिती आहे. तर धर्मगुरु बाबुसिंग राठोड यांचंही नाव भाजपने राज्यपालांकडे पाठवल्याची माहिती आहे. शिवसेन शिंदे गटाकडून मनिषा कायंदे, हेमंत पाटील यांचं नाव सुचवलं आहे. तर राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून पंकज भुजबळ आणि इद्रीस नाईकवडी यांची नावं राज्यपालांकडे पाठवल्याची माहिती आहे. त्यामुळे आता राज्यपाल या नावांना कधी मंजुरी देतात, हे पाहणं महत्वाचं असणार आहे.



# वरचे संकेत मिळताच नितीन नाईकनवरे लागले कामाला.

माजलगाव पुण्यभूमी प्रतिनिधी 14 ऑगस्ट रोजी नितीन नाईकनवरे यांचा वाढदिवस साजरा झाला.यावेळी विधानसभेच्या अनुषंगाने मोठे शक्ती प्रदर्शन करण्यात आले होते.याची नोंद विविध राजकीय पक्षांनी घेतली होती.दरम्यान सोमवार दि.14 रोजी नितीन नाईकनवरे यांच्या निवासस्थानी आयोजित कार्यकर्ता बैठकीत तुम्ही ठरवाल ते धोरण आणि बांधताल ते तोरण असा एकमुखी निर्णय प्रमुख कार्यकर्तासह सरपंचांच्या बैठकीत घेण्यात आला.यातून वरिष्ठांच्या संकेत मिळताच नितीन नाईकनवरे विधानसभेच्या कामाला लागल्याचे दिसत आहे. माजलगाव बाजार समितीचे माजी सभापती नितीन नाईकनवरे यांच्या निवासस्थानी सोमवार दि.14 रोजी दुपारी कार्यकर्ता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.येत्या विधान सभेत आपली उमेदवारी असावी किंवा नाही.याच्या चाचपणीसाठी या बैठकीचे आयोजित करण्यात आले होते.तत्पूर्वी 14 ऑगस्ट रोजी नितीन नाईकनवरे यांच्या वाढदिवसानिमित्त मोठे शक्ती प्रदर्शन करण्यात आले होते.याची नोंद राजकीय पक्षांनी घेतली असल्याची माहिती आहे.त्यामुळे वरचे संकेत मिळतात नितीन नाईकनवरे कामाला लागले आहेत. यावेळी आयोजित कार्यकर्ता बैठकीला पंचक्रोशीतून प्रमुख कार्यकर्त्यांनी बैठकीत उपस्थिती लावली होती.दरम्यान सर्वच उपस्थित कार्यकर्त्यांनी नितीन नाईकनवरे यांना विधानसभा लढवण्याचा आग्रह केला.दादा, तुमचे काम सर्व व्यापक आहे.सर्व जाती धर्मात आपल्याला मानणारा वर्ग आहे.समाज उपयोगी अनेक काम आपण मार्गी लावली आहेत. त्यामुळे येत्या विधानसभेत नेतृत्व करण्याची आपली धमक आहे. आपण कोणत्याही पक्षाकडून उमेदवारी घ्या.आम्ही तुमच्या सोबत आहोत.आपण बांधाल ते धोरण आणि घेताल तो निर्णय आमच्यासाठी मान्य असेल. असा एकमुखी निर्णय यावेळी उपस्थिती कार्यकर्त्यांनी घेतला आहे.यावेळी अनेक गावच्या सरपंचासह प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# बीडमध्ये युवासेनेचा अभुतपुर्व मेळावा संपन्न

## हजारो युवा सैनिकांसह बाजीराव चव्हाणांचे बीडमध्ये शक्तिप्रदर्शन.

### शेतकऱ्यांच लेकरु बाजीराव चव्हाण बीडचा आमदार झाल्यास हा बीडकरांचा आनंद - पुर्वेश सरनाईक वरीष्ठ जो आदेश देतील तो मला मान्य - बाजीराव चव्हाण

### युवासेनेच्या रॅलीत आपली ताकत दाखवत बाजीराव चव्हाण यांनी विधानसभेसाठी दंड थोपटले. बाजीराव चव्हाणयांना विधानसभा लढवण्याची इच्छा व्यक्त करण्याचा पूर्ण अधिकारी - पूर्वेश सरनाईक

**युवासेना राज्यकार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांच्याकडून बाजीराव चव्हाणांना विधानसभा लढवण्याचे संकेत, पुर्वेश सरनाईक यांच्या उपस्थितीत बाजीराव चव्हाण यांनी विधानसभेसाठी दंड थोपटले.**
**२**
**आरे कोण आला रे कोण आला शिवसेनेचा वाघ आला हजारों युवांच्या घोषणाने बीड शहर दुमदुमले, एकच वादा बाजीराव दादा; हजारों युवांच्या घोषणातुन बाजीराव चव्हाण दमदार आमदार म्हणून घोषवाक्य. सरनाईक यांचा विधानसभेसाठी ग्रिन सिग्नल मिळताच युवासेनेच्या युवकांत आनंदाचे वातावरण.**

दैनिक लोकआरंभ/ /

बीड प्रतिनिधी : राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे साहेब व खासदार श्रीकांत शिंदे यांच्यावर विश्वास ठेऊन महाराष्ट्रातील युवासेना राज्यात आपली पाळंमुळं मजबुत करण्यासाठी सज्ज झाली आहे. त्याचेच अभुतपुर्व चित्र आज बीडच्या युवा सेनेच्या युवा संवाद मेळाव्यातुन दिसून आले. आरोग्य दूत बाजीराव चव्हाण हजारोंच्या संख्येने युवाशक्तीची रॅली काढुन आपल्या मागील युवासेना युवाशक्ती दाखवुन दिली आहे. युवासेना राज्यकार्याध्यक्ष श्री. पुर्वेशजी सरनाईक यांच्या उपस्थितीत आज बाजीराव दादा चव्हाण यांनी शेकडो बाईक, व चारचाकी व्दारे प्रचंड प्रमाणात युवासेना, युवाशक्ती सोबती घेत "ना भुतो ना "भविष्य अशी अभुतपुर्व रॅली बीड शहरातुन काढुन, बीड जिल्ह्यातील आजी माजी भावींना हादरा दिला आहे. त्यामुळे सुजान पुढाऱ्यांना बाजीराव चव्हाण यांची धास्ती नक्कीच बसली आहे. आज बीडमध्ये युवासेनेचा युवा संवाद मेळावा संपन्न झाला त्यावेळी मेळाव्यास प्रमुख उपस्थिती म्हणून युवासेना राज्यकार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक हे उपस्थित होते. यावेळी बाजीराव चव्हाण यांनी आपल्याला विधानसभा लढवण्याची इच्छा व्यक्त केली. सोबत यांच्या हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या युवाशक्तीनेही आपल्या घोषवाक्यातुन बाजीराव चव्हाण यांनाच संधी मिळावी ही ईच्छा दर्शवीली आहे. कार्यक्रमात यावेळी युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक बाजीराव चव्हाण यांच्या बद्दल व्यासपीठावर बोलतांना म्हणाले की बाजीराव चव्हाण यांनी बीडमध्ये आजपर्यंत कोणीजे केलं नाही ते एकट्या बाजीराव चव्हाण यांनी जनसेवेचे काम करुन दाखवले आहे. बीडच्या लाखों गोरं गरीबांना आपल्या शस्त्रक्रिया साठी त्यांनी दहा कोटिंच्या वर



वैद्यकीय मदत मिळवुन दिली आहे. तसेच आज पर्यंत त्यांनी आपल्या कार्यालयात बसुन हजारो गोरं गरीबांचे विवीध प्रशन सोडवुन त्यांना न्याय मिळवून दिला आहे. आज बीड मधील जनता त्यांना आपला हक्काचा बाजीराव मानत आहे. त्यामुळे त्यांना येणाऱ्या विधानसभात निवडणुक लढवण्याची इच्छा व्यक्त करण्याचा त्यांना पुर्ण अधिकारी आहे. सोबतच बाजीराव चव्हाण हा एक शेतकऱ्यांचा पोरगा आहे एक सामान्य घरातुन आलेला शेतकऱ्याचा मुलगा आहे. आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या विश्वासाचा माणुस ते बनले आहेत. आज बीडकरांचा मणातला आपला माणुस बाजीराव चव्हाण हे बनले आहेत. त्यामुळे यांच्यावर मला पुर्ण विश्वास आहे की बाजीराव चव्हाण यांना वरिष्ठांकडुन ग्रिन सिग्नल मिळाला तर ते येणाऱ्या विधानसभा मध्ये नक्कीच आपल्या संधीचं सोनं करतील व बीडचा कायापालट केल्याशिवाय राहणार नाहीत. म्हणून मी खुद मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व खासदार श्रीकांत शिंदे साहेब यांच्या कानावर बाजीराव चव्हाण यांचे काम व बीड मध्ये चालु असलेले त्यांचे विविध कार्य पोहचवणार आहे. तसेच त्यांना मी न्याय मिळवून देण्यासाठी त्यांच्या पाठीशी उभा आहे. कारण आजच्या रॅलीतुन बाजीराव चव्हाण यांनी दाखवून दिले की बीडमध्ये युवासेना पुर्ण त्यांनी मजबूत पणेउभा केली आहे. बीड जिल्ह्यातील हजारोंच्या संख्येने युवाशक्ती त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. यावरुनच समजते की बाजीराव चव्हाण बीडमध्ये शिवसेनेचा खंबीर उमेदवार आहे. म्हणून युवासेना राज्यकार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांच्यावर खुश असल्याचे दिसून आले. या रॅलीस व युवासंवाद मेळाव्याला पुर्ण ताकतीशी यशस्वी करणारे युवासेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, जिल्हाप्रमुख अजय सुरवसे यांनी घेतले. वरील सर्व घडामोडींतुन दिसुन येते की बीडची विधानसभेची माळा बाजीराव चव्हाण यांच्या गळ्यात पडणार असल्याचे संकेत आहेत. त्यामुळे बाजीराव चव्हाण यांच्या हजारो युवा सैनिक, व कार्यकर्त्यांनी विधानसभेला बाजीराव चव्हाण यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहण्याचे व त्यांना जिंकण्यासाठी आपली कंबर असलेली पुर्व दिशा आजच्या शक्ती प्रदर्शनातुन दिसुन आली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com